International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly

ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.8 No.5 May – June 2021

# अपंगांसाठीचे किंवा दिव्यांगासाठीचे कायदे

**प्रा. दत्तात्रय कुंडलिक पाटील**

*प्रमुख, समाजशास्त्र विभाग*

*कर्मवीर हिरे कला, शास्त्र, वाणिज्य आणि*

*शिक्षणशास्त्र महाविद्यालय, गारगोटी.*

**प्रस्तावना:**

भारतीय राज्यघटनेनुसार भारतामध्ये सर्व नागरिकांना समता, स्वातंत्र्य, न्याय, आणि प्रतिष्ठा यांचे आश्वासन देण्यात आलेले आहे. यामध्ये अपंग / दिव्यांग नागरिकांचाही यामध्ये निर्विवाद समावेश आहे. तसेच घटनेनुसार अपंगांच्या सक्षमीकरणाची थेट जबाबदारी राज्य सरकारवर सोपवण्यात आलेली आहे.

घटनेच्या २५३ कलमातील संघराज्याच्या १३ क्रमांकाच्या मुद्द्यांमध्ये अधिनियमित केले आहे की, अपंग व्यक्तीना समान संधी मिळेल. तसेच राष्ट्र उभारणीच्या कार्यात त्यांचा संपूर्ण सहभाग राहील.

अपंगासाठीचे कायदे खालीलप्रमाणे अभ्यासू,

**अभ्यासाची उद्दिष्टे :**

१) दिव्यांग कायद्यांचा अभ्यास करणे.

2) दिव्यांग व्यक्ती अधिकार अधिनियम -२०१६ चा अभ्यास करणे.

**अभ्यास पद्धती:**

प्रस्तुत शोधनिबंध साठी दुय्यम साधनसामुग्रीचा वापर केला यात मासिके, परिपत्रके, पुस्तके यांचा वापर केला.

**अपंगांसाठीचे / दिव्यांगासाठीचे कायदे :**

**१) मानसिक आरोग्य कायदा १९८७:**

**“Mental Health Act-1987”** हा कायदा २२ मे १९८७ रोजी पारित केला. यामध्ये मानसिक आजारी व्यक्तींमध्ये उपचार आणि काळजी घेणे, त्यांची मालमत्ता आणि घडामोडी संदर्भात आणि त्यांच्याशी संबंधित किंवा अनुषंगिक बाबीसाठी अधिक चांगल्या तरतुदीचे एकत्रीकरण करण्यासाठी हा कायदा केला.

या कायद्याने **१९१२ चा 'इंडियन लुनेसी ॲक्ट'** **(Indian Lunacy Act of 1912)** या मानसिक आरोग्य समस्या नियंत्रित करणाऱ्या पूर्वीच्या विद्यमान राष्ट्रीय कायद्याला मागे टाकले आहे. (https://ncwapps.nic.in/acts/)

या कायद्यामध्ये १० प्रकरणे समाविष्ट केलेली असून यामध्ये मतिमंद व्यक्ती सोडून मानसिक आजाराने ग्रस्त असणाऱ्या व्यक्तीसाठी या कायद्यामध्ये तरतुदी केलेल्या आहेत. त्यामुळे मतिमंद व्यक्तीसाठी या कायद्यामध्ये कोणतीही तरतूद केलेली नाही आणि त्यामुळे हा कायदा मतिमंदांच्यासाठी पोकळी निर्माण करणारा जाणवतो.

**२) भारतीय पुनर्वसन परिषद अधिनियम १९९२:**

१ सप्टेंबर १९९२ रोजी भारतीय पुनर्वसन परिषद अधिनियम (The Rehabilitation Council of India) हा कायदा लागू केला. या कायद्यात अधू याचा अर्थ कोणत्याही विकलांगतेने पीडित असलेली व्यक्ती असा घेतलेला आहे. यामध्ये मतिमंद याचा अर्थ एखाद्या व्यक्तीचा मनाचा अपूर्ण विकास किंवा खुंटलेली वाढ असा असून तिचे विशेष लक्षण म्हणजे बुद्धिमत्तेची अवसामान्यता असा अर्थ अधोरेखित केला आहे.

या कायद्यामध्ये 'पुनर्वसन' या शब्दाचा निर्देश विकलांग व्यक्तींना शारीरिक, संवेदनात्मक, बौद्धिक, मानसिक किंवा सामाजिक कार्य करणाच्या स्तरापर्यंत पोहोचण्यास आणि तो स्तर राखण्यास सहाय्यभूत होण्याचा उद्देश असलेल्या प्रक्रिये बाबत आहे.

या कायद्यामध्ये व्यावसायिकांच्या व कर्मचारीवर्गाच्या प्रशिक्षणाचे विनियमन आणि संनियंत्रण करण्यासाठी पुनर्वसन आणि विशेष शिक्षण यामधील संशोधनाच्या प्रचलनासाठी भारतीय पुनर्वसन परिषद घटित करणे आणि केंद्रीय पुनर्वसन आणि पुनर्वसन नोंदवही ठेवणे आणि त्यांच्याशी संबंधित बाबी करता या अधिनियमात तरतुदी केलेल्या आहेत.

या अधिनियमत पुनर्वसन अहर्ताप्राप्त असलेल्या व्यक्तींनी अधू म्हणजे (मतिमंद) व्यक्तीच्या पुनर्वसनाचे कार्य करण्याबाबत तिचे नाव त्यावेळी नोंदविण्यात आलेले आहे. अशी प्रत्येक व्यक्ती भारताच्या कोणत्याही भागात पुनर्वसन व्यावसायिक म्हणून कार्य करण्यास आणि अशा पुनर्वसन कार्याबाबत त्यावेळेच्या कायद्यानुसार औषधे किंवा अन्य साधन यांच्या संबंधात जो खर्च, आकार किंवा कोणतीही फी मिळण्याच्या त्यांचा हक्क असल्यास ती वसूल करेल अशा स्वरूपात तरतुदी या कायद्यात घेण्यात आलेल्या आहेत. (https://niepmd.tn.nic.in/)

**सारांश** – हा कायदा ही मतिमंदासाठी अपुऱ्या तरतुदी असणारा वाटतो.

**३) अपंग व्यक्ती कायदा (समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि पूर्ण सहभाग):**

**१९९५ (Persons With Disabilities Act-1995)**

अपंग व्यक्ती अधिनियम कायदा १९९५ यामध्ये अंध, कमी दृष्टी, कमी ऐकायला येणारे, श्रवण शक्ती कमजोर असणारे, मानसिक कमजोर असणारे, हाता पायाने अपंग, कृष्टरोग मुक्त, **मतिमंद** यांच्या साठी हा कायदा १९९५ मध्ये हिवाळी अधिवेशनामध्ये मंजूर केला आणि १ जानेवारी १९९६ पासून हा कायदा संपूर्ण देशभर लागू करण्यात आला. या कायद्यामध्ये १४ प्रकरणे आणि ७४ कलमे आहेत.

**अपंग व्यक्ती अधिनियम १९९५ कायद्याचे उद्देश:**

१) या कायद्यामध्ये अपंग व्यक्तींना समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि पूर्ण सहभाग दिला आहे.

२) राज्य सरकार किंवा स्थानिक प्राधिकरणाद्वारे पुरेसा वित्तपुरवठा हा अपंग व्यक्तीच्या अनेक विकासासाठी केला जाऊ शकतो.

३)जम्मू आणि काश्मीर हे राज्य वगळता अपंग व्यक्ती कायदा हा संपूर्ण देशामध्ये लागू होतो.

४) या कायद्यानुसार मानसिक आजार म्हणजे मंदबुद्धी सोडून संबंधित कोणत्याही व्यक्तीला कोणताही मानसिक आजार असेल तर तो या कायद्या अंतर्गत मिळणारे सर्व लाभ घेऊ शकतो.

५) या कायद्याअंतर्गत अपंग व्यक्तीसाठी प्रोत्साहनात्मक आणि प्रतिबंधात्मक अशा दोन्ही गोष्टींची तरतूद केलेली आहे जसे की शिक्षण, रोजगार, संशोधन, प्रशिक्षण, विकास, आरक्षण, अपंग लोकांसाठी बेरोजगार भत्ता इत्यादी.

**अपंग व्यक्ती कायदा १९९५ यातील तरतुदी:**

अ) या कायद्यामार्फत जे लोक शारीरिकदृष्ट्या अपंग आहेत अशा लोकांच्यासाठी समित्या स्थापन केल्या जातात आणि यामध्ये केंद्र राज्य सरकारचे समाजकल्याण मंत्री, राष्ट्रपती नेमतात. या समितीमार्फत विद्यार्थ्यांना शिक्षण, रोजगार, आरोग्य, प्रशिक्षण आणि संशोधन यामध्ये प्रगती करण्यासाठी मदत करतात.

ब) ज्या शाळेमध्ये मतिमंद आणि दिव्यांग विद्यार्थी आहेत. अशा शाळेमध्ये वेगवेगळया उपकरणांची व्यवस्था असावी. जेणेकरून शारीरिक दृष्ट्या अपंग असणाऱ्या विद्यार्थ्यांना कोणतीही गोष्ट शिकण्यास आवड निर्माण व्हावी.

क) या कायद्यानुसार अपंग असणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांना नोकरी किंवा रोजगार मिळवून देणे ही केंद्र सरकारची किंवा राज्य सरकारची जबाबदारी असते. ज्या क्षेत्रामध्ये अशा विद्यार्थ्यांना रोजगार मिळू शकतो. अशा क्षेत्रांचा विकास करून त्या क्षेत्रांमध्ये अपंगांना रोजगार मिळवून देणे हे कायद्याचे उद्दिष्ट आहे.

ड) जे शारीरिक दृष्ट्या विकलांग आहेत त्यांचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर नेहमी सरकारी किंवा निमसरकारी नोकरीमध्ये आरक्षण मिळण्याची तरतूद यामध्ये केलेली आहे. तसेच यांना नोकरी मिळावी अशीही तरतूद केलेली आहे.

इ) जे विद्यार्थी अपंग आहेत अशांना अपंगत्वाशी संबंधित उपकरणे तयार करण्याची जबाबदारी ही केंद्र व राज्य सरकारची आहे.

ई) जी मुले अपंग आहेत अशांना आरोग्य सुविधा मोफत उपलब्ध करून देणे. तसेच अपंग व्यक्तींच्यासाठी वेगवेगळया चाचण्या मोफत उपलब्ध करून देणे ही सरकारची जबाबदारी आहे.

उ) अपंग मुलांना प्रवासामध्ये कमी शुल्क व अपंग व्यक्तींना सूट अशा तरतुदी या कायद्यामध्ये केलेल्या आहेत .

ऊ) तसेच अपंगासाठी स्वतंत्र शाळा निर्माण करणे या कायद्यामध्ये तरतुदी आहेत.

ए) गरोदर आई आणि बाळयांच्या जन्मापूर्वी आणि गर्भावस्थेदरम्यान आणि प्रसूतीनंतरची काळजी घेण्यासाठी उपाययोजना करणे अशी तरतूद या कायद्यात आहे.

ऐ) अपंग मुलांना विशेष शाळेमध्ये व्यावसायिक प्रशिक्षण आणि सुविधा देण्याचा प्रयत्न करावा अशी तरतूद या कायद्यामध्ये केलेली आहे. (https://thenationaltrust.gov.in/)

**४) १९९९ चा राष्ट्रीय न्यास कायदा (The National Trust Act-1999):**

अपंग व्यक्ती कायदा १९९५ साली संमत झाला पण या कायद्यात मतिमंदासाठी अनेक त्रुटी असल्याने मेंदूचा पक्षाघात झालेल्या व्यक्तींचा यामध्ये फारसा विचार नव्हता म्हणून त्यांचा स्वतंत्र कायदा करावा अशी कल्पना मूळ धरू लागली यातूनच नंतर या कायद्याची कल्पना पुढे आली. यातून शेवटी १९९९ मध्ये आत्ममग्न, मेंदूचा पक्षाघात झालेला, मतिमंद आणि बहुविकलांग व्यक्तींच्या पुनर्वसनासाठी राष्ट्रीय न्यास कायदा ऑक्टोबर २००० मध्ये अंमलात आला.

भारतामध्ये एक लाखाहून अधिक अपंग मानसिकदृष्ट्या अपंग आहेत आणि अशा लोकांचे उपद्रव मूल्य सर्वात कमी आणि मतदानाचा हक्क नसल्याने राजकीय पक्ष यांच्याकडे दुर्लक्ष करतात. यांच्या पुनर्वसनासाठी स्वतंत्र कायद्याची गरज होती. ही गरज १९९९ च्या कायद्याने पूर्ण केलेली आहे. राष्ट्रीय न्यास मंडळामध्ये एकूण २२ सदस्य असतात. यामध्ये एक पूर्णवेळ अध्यक्ष, नोंदणीकृत संस्थांचे ९ प्रतिनिधी आणि औद्योगिक संस्थांचे तीन प्रतिनिधी, स्वीकृत ८ सदस्य असे सदस्य राष्ट्रीय न्यास कायद्यामध्ये असतात.

**राष्ट्रीय न्यास कायद्याची उद्दिष्टे अभ्यासू:**

१) अपंग लोकांना सामर्थ्य व सशक्त बनवणे, त्यांच्या कुटुंबातच त्यांना राहता यावे यासाठी सर्व सुविधांची उपलब्धता करणे.

२) ज्या परिसरात, वस्तीमध्ये अपंग व्यक्ती राहतात तेथेच स्वयंपूर्ण आत्मनिर्भरपणे यांना जगता येईल यासाठी त्यांना सहकार्य करणे.

३) कौटुंबिक आधार नसलेल्या अपंग व्यक्तींच्या समस्या हाताळणे.

४) अपंग व्यक्तींच्या पालकांचा मृत्यू झाला असेल तर त्याची देखभाल व सुरक्षेसाठी उपाययोजना करणे.

५) अनाथ, अपंग व्यक्तीसाठी विश्वस्त नेमण्यासाठी कार्यपद्धती विकसित करणे.

६)अपंगांच्या हक्कांचे उल्लंघन होऊ नये म्हणून त्यांना समान संधी मिळावी व त्यांनी समाजाच्या मुख्य प्रवाहात यावे यासाठी वातावरण निर्मिती करणे.

७) राष्ट्रीय न्यासाची उद्दिष्टे व कार्यक्रम सर्व वयोगटासाठी व सर्व सामाजिक आर्थिक स्तरातील अपंगासाठी आहेत.

**राष्ट्रीय न्यास कायद्यामधील मान्यताप्राप्त कार्यक्रम**:

अ) अपंग व्यक्ती समाजात स्वयंपूर्ण होऊन समाजाच्या मुख्य प्रवाहात येतील. यासाठी पोषक वातावरण निर्मिती करणे.

ब) अपंग व्यक्तींच्या कुटुंबांना समुदेशन प्रशिक्षण करणे.

क) अपंगासाठी वसतिगृह व निवासी संस्थाची स्थापना करणे.

ड) अपंगांची प्रासंगिक/ अल्पावधीसाठी देखभाल करण्यासाठी शॉर्ट 'स्टे होम' स्थापन करणे.

इ) अपंगांचे हक्क जपण्यासाठी अपंगांचे स्वावलंबी गट विकसित करणे.

(https://thenationaltrust.gov.in/1999)

राष्ट्रीय न्यास कायद्याच्या संकल्पनेत 'एकमेका साह्य करू अवघे धरू सुपंथ' या विचारप्रणालीला महत्त्व आहे.

**सारांश**, मतिमंदांच्या हक्कांची जपणूक करणे आणि त्यांचे पुनर्वसन हा या कायद्याचा प्रमुख उद्देश आहे. मतिमंदांना स्वतःचे स्वास्थ्य व हितसबंध जपण्यासाठी सक्षम पालक असणे हा त्यांचा हक्क आहे. किमान मतदानाच्या अधिकारामध्ये राजकर्त्यांनी दुर्लक्षलेली मतिमंद व्यक्ती राज्यकर्त्यांच्या दृष्टीक्षेपात येतील. ही या कायद्याची सर्वात विशेष नोंद आहे.

**५) अपंग व्यक्तींसाठी राष्ट्रीय धोरण- २००६ :**

भारत सरकारने फेब्रुवारी २००६ मध्ये अपंग व्यक्तींसाठी राष्ट्रीय धोरण **(National Policy for Persons with Disability)** तयार केले. जे अपंग व्यक्तींच्या **शारीरिक, शैक्षणिक आणि आर्थिक पुनर्वसनाशी** संबंधित आहे. याशिवाय हे धोरण अपंग महिला आणि मुलांचे पुनर्वसन, अडथळे मुक्त वातावरण, सामाजिक सुरक्षा, संशोधन इत्यादींवर भर देते.

अपंग व्यक्ती हे देशासाठी मौल्यवान मानव संसाधन आहेत. आणि त्यांना समान संधी, त्यांच्या हक्कांचे संरक्षण आणि समाजात पूर्ण सहभाग प्रदान करणारे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न करणे हे या राष्ट्रीय धोरणाचे उद्देश आहेत.

**अपंगत्व प्रतिबंध** - यात अपंगत्व निर्माण करणाऱ्या रोगांना प्रतिबंध करण्यासाठी आणि गर्भधारणेच्या कालावधीत आणि त्यानंतरच्या काळात अपंगत्व रोखण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांबाबत जागरुकता निर्माण करण्यासाठी आणि त्यांची व्याप्ती वाढवण्यासाठी कार्यक्रमाची आवश्यकता आहे.

**पुनर्वसन उपाय** - यामध्ये शारीरिक पुनर्वसन, व्यावसायिक शिक्षणासह शैक्षणिक पुनर्वसन, समाजातील सन्माननीय जीवनासाठी आर्थिक पुनर्वसन. ज्यामध्ये लवकर ओळख आणि हस्तक्षेप, समुपदेशन आणि वैद्यकीय हस्तक्षेप आणि सहाय्य आणि उपकरणांची तरतूद समाविष्ट आहे.

**अपंग महिला -** अपंग महिलांना शोषण आणि अत्याचारापासून संरक्षण आवश्यक आहे. अपंग महिलांच्या विशेष गरजा लक्षात घेऊन त्यांना शिक्षण, रोजगार आणि इतर पुनर्वसन सेवा देण्यासाठी विशेष कार्यक्रम विकसित केले जातील. सरकार अशा प्रकल्पांना प्रोत्साहन देईल ज्यामध्ये एकूण लाभार्थ्यांपैकी किमान २५% अपंग महिलांचे प्रतिनिधित्व सुनिश्चित केले जाईल.

**अपंग मुले** -अपंग मुलांसाठी काळजी, संरक्षण आणि सुरक्षिततेचा अधिकार सुनिश्चित करणे, गंभीर अपंग मुलांच्या संरक्षणाची खात्री करणे.

**अडथळा मुक्त वातावरण** - अडथळा मुक्त डिझाइनचे उद्दिष्ट हे आहे की व्यक्तींच्या स्वतंत्र कार्यास समर्थन देणारे वातावरण प्रदान करणे. जेणेकरुन ते प्रत्येक दैनंदिन क्रियाकलापांमध्ये मदतीशिवाय सहभागी होऊ शकतील. त्यामुळे जास्तीत जास्त प्रमाणात, सार्वजनिक वापरासाठी इमारती / ठिकाणे / वाहतूक व्यवस्था अडथळामुक्त केली जाईल.

**अपंगत्व प्रमाणपत्रे जारी करणे** - साध्या, पारदर्शक आणि ग्राहक-अनुकूल प्रक्रियेचा अवलंब करून अपंग व्यक्तींना कमीत कमी वेळेत कोणत्याही अडचणीशिवाय अपंगत्व प्रमाणपत्र मिळावे याची सरकार खात्री देईल.

**सामाजिक सुरक्षा** - अपंग व्यक्ती, त्यांचे कुटुंब आणि काळजी घेणाऱ्यांना दैनंदिन जीवन, वैद्यकीय सेवा, वाहतूक, सहाय्यक उपकरणे इत्यादी कार्ये सुलभ करण्यासाठी भरीव अतिरिक्त खर्च करावा लागतो. त्यामुळे त्यांना विविध मार्गांनी सामाजिक सुरक्षा प्रदान करण्याची जबाबदारी केंद्र सरकार, राज्य सरकार घेऊन अपंगाना प्रोत्साहन दिले जाईल.

**अशासकीय संस्था (NGO's) चा प्रचार**- काही स्वयंसेवी संस्था मानव संसाधन विकास आणि संशोधन उपक्रमही हाती घेत आहेत. सरकार त्यांना धोरण तयार करणे, नियोजन, अंमलबजावणी, देखरेख यामध्ये सक्रियपणे सहभागी करून घेत आहे. NGOs मध्ये नेटवर्किंग, माहितीची देवाणघेवाण यांना प्रोत्साहन आणि

सुविधा दिली जाईल. सुविधा नसलेल्या आणि दुर्गम भागात काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि त्यांना प्राधान्य देण्यासाठी पावले उचलली जातील. नामांकित स्वयंसेवी संस्थांनाही अशा क्षेत्रांमध्ये प्रकल्प हाती घेण्यासाठी प्रोत्साहित केले जाईल.

**अपंग व्यक्तींवरील नियमित माहितीचे संकलन** - राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण संस्था १९८१ पासून दहा वर्षांतून एकदा नियमितपणे अपंग व्यक्तींच्या सामाजिक-आर्थिक परिस्थितीची माहिती संकलित करत आहे. जनगणना-२००१ पासून जनगणनेने अपंग व्यक्तींची माहिती गोळा करण्यासही सुरुवात केली आहे. नॅशनल सॅम्पल सर्व्हे ऑर्गनायझेशनला ५ वर्षांतून एकदा तरी दिव्यांग व्यक्तींची माहिती गोळा करावी लागेल.

**संशोधन** - अपंग व्यक्तींच्या जीवनाचा दर्जा सुधारण्यासाठी, त्यांचे सामाजिक-आर्थिक आणि सांस्कृतिक संदर्भ, अपंगत्वाची कारणे, बालपणातील शिक्षण पद्धती, वापरकर्ता-अनुकूल सहाय्य आणि उपकरणे विकसित करणे आणि अपंगांशी संबंधित सर्व बाबींवर संशोधनाचे समर्थन केले जाईल.

**खेळ, मनोरंजन आणि सांस्कृतिक जीवन**- अपंग व्यक्तींना खेळ, मनोरंजन आणि सांस्कृतिक सुविधांमध्ये प्रवेश करण्याचा अधिकार आहे. त्यांना विविध खेळ, मनोरंजन आणि सांस्कृतिक उपक्रमांमध्ये सहभागी होण्याची संधी देण्यासाठी सरकार आवश्यक ती पावले उचलेल.

**अंमलबजावणीची जबाबदारी:**

धोरणाच्या अंमलबजावणीशी संबंधित सर्व बाबींमध्ये समन्वय साधण्यासाठी सामाजिक न्याय आणि अधिकार मंत्रालय हे नोडल मंत्रालय असेल. राष्ट्रीय धोरणाच्या अंमलबजावणीशी समन्वय साधण्यासाठी एक आंतर मंत्रालयीन संस्था स्थापन केली जाईल. प्रमुख एनजीओ, अपंग लोक संस्था, वकील गट आणि पालक, तज्ञ आणि व्यावसायिक यांच्या कौटुंबिक संघटनांसह सर्व भागधारकांचे देखील या संस्थेवर प्रतिनिधित्व केले जाईल.

दर ५ वर्षांनी राष्ट्रीय धोरणाच्या अंमलबजावणीचा सर्वसमावेशक आढावा घेतला जाईल. अंमलबजावणीची स्थिती दर्शविणारा दस्तऐवज आणि पाच वर्षांचा रोडमॅप राष्ट्रीय स्तरावरील अधिवेशनात झालेल्या चर्चेच्या आधारे तयार केला जाईल. राज्य सरकारे आणि केंद्रशासित प्रदेश प्रशासनांना राज्य धोरण तयार करण्यासाठी आणि कृती आराखडा विकसित करण्यासाठी पावले उचलण्याचे आवाहन केले जाईल. (https://disabilityaffairs.gov.in/2006)

**६) दिव्यांग व्यक्ती अधिकार अधिनियम -२०१६ (The Rights of Persons With Disabilities Act-2016):**

भारतीय संसदेने विकलांगांच्या साठी १६ डिसेंबर २०१६ मध्ये दिव्यांग व्यक्ती अधिकार अधिनियम हा कायदा संमत केला. हा कायदा याची कल्पना जून २००९ मध्ये (NCPEDP) या राष्ट्रीय समितीची सभा दिव्यांगांचे हक्कासाठी भरली होती. आणि अपंग व्यक्ती १९९५ च्या कायद्यात सुधारणा करण्यासाठी शंभरच्या

वर सूचना आल्यानंतर UNCRPD या सभेने विकलांगासाठी हा कायदा तयार केला. या कायद्याची अंमलबजावणी २८ डिसेंबर २०१६ रोजी सर्व देशात करण्यात आली.

यामध्ये दिव्यांगांना स्वतःचा आदर स्वतःच्या आवडीने निर्णय वैयक्तिक स्वातंत्र्य, यांच्यामध्ये भेदभाव न करणे, यांचा पूर्ण सहभाग आणि समाजामध्ये समावेश अपंग असलेल्या व्यक्तीचा खऱ्या अर्थाने स्वीकार, यांना संधीची समानता, पुरुष आणि स्त्री यांच्यामध्ये सुद्धा समानता, अपंग मुलांमध्ये विकसित होणाऱ्या क्षमतेबद्दल आदर व त्यांच्या अधिकाराबद्दल आदर यामध्ये एकूण १७ प्रकरणे समाविष्ट केलेली आहेत आणि या कायद्याचे वैशिष्ट्य म्हणजे या कायद्यामध्ये पूर्वीच्या ७ प्रकारच्या अपंगांचे प्रमाण वाढून **२१** प्रकारच्या अपंगांना **'दिव्यांग'** असा एकच शब्द संबोधला आहे. हे या कायद्याचे वैशिष्ट्य आहे.

**कायद्यातील महत्वाच्या तरतुदी:**

**कलम ३.** दिव्यांग व्यक्तींना समानता, सन्मान, आदर, सचोटी विषयी हक्क इतरांप्रमाणे प्रमाणे बजावता येतील ही सुयोग्य शासनाची जबाबदारी असेल.

**कलम-४.** दिव्यांग स्त्रिया व मुले यांचे हे आपले हक्क इतरांप्रमाणे उपभोगतील हे सुनिश्चित करण्यासाठी शासन व स्थानिक प्राधिकरणे उपायोजना करतील.

**कलम-५.** १) दिव्यांग असलेल्या व्यक्तींना समाजामध्ये राहण्याचा अधिकार असेल. २) कोणत्याही विशिष्ट निवासी व्यवस्थित राहणे दिव्यांगांना बंधनकारक करता येणार नाही. वय, लिंग विचारात घेऊन राहण्याकरीता आवश्यक असणारी वैयक्तिक मदत समाविष्ट आहे. यामध्ये प्रवेश दिला जाईल.

**कलम-६**. सुयोग्य शासन अपंगत्व असलेल्या व्यक्तींना क्रूर, अमानुष किंवा अपमानस्पद वागणुकीपासून संरक्षण देण्यासाठी योग्य उपाययोजना करील.

**कलम-७.** कोणताही पोलीस ज्याकडे अपंग व्यक्तींशी गैरवर्तन, हिंसा किंवा शोषण केले गेल्याची माहिती कळते. त्याने पीडित व्यक्तीस योग्य कायदेशीर मदत करावी. ज्यात मोफत कायदेशीर मदत मिळवण्याचा अधिकार असेल.

**कलम-८**. अपंग असलेल्यांना धोका, सशस्त्र संघर्ष, मानवहितवादी आणीबाणी आणि नैसर्गिक आपत्ती, परिस्थितीत समान संरक्षण आणि सुरक्षितता मिळेल. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण अपंग व्यक्तींच्या तपशिलाची नोंद ठेवेल.

**कलम- ९.** अपंगत्वाच्या कारणामुळे अपंग व्यक्तीस पालकापासून वेगळे करता येणार नाही. पाल्यांचा सर्वोत्तम हिताच्या दृष्टीने आवश्यक असल्यामुळे सक्षम न्यायालयाच्या आदेशानुसार असेल तर प्रकरण वगळून.

**कलम-१०**. अपंग व्यक्तीस पुनरुत्पादन करण्याचा अधिकार तसेच कुटुंब नियोजन, माहिती मिळविण्याचा तसेच संमतीशिवाय वैद्यकीय प्रक्रियेला सामोरे न जाण्याचा अधिकार असेल.

**कलम-११**. अपंग व्यक्तीस निवडणूक आयोग मतदानामध्ये सुगम्यता / सुलभता प्रदान करेल.

**कलम-१२.** अपंग व्यक्तीस भेदभावाशिवाय न्यायालयीन किंवा इतर कोणत्याही पंचायतीमध्ये प्रवेश करण्याचा अधिकार राहील. उच्च आधाराची गरज असल्यास शासन योग्य त्या आधाराच्या योजना व्यवस्थित राबवण्यासाठी पावले उचलेल इ.

**कलम-१३.** अपंग व्यक्तीस इतराप्रमाणे चल, अचल मालमत्तेवर मालकी किंवा वारसाने प्राप्त करण्याचे, आर्थिक मुद्द्यांना नियंत्रण करण्याचे, बँकेचे कर्ज घेण्याचे हक्क असतील. अपंग व्यक्तीला सहाय्य देणारी कोणतीही व्यक्ती अवास्तव प्रभावाचा वापर करणार नाही. स्वायत्तता, सन्मान व खाजगीकरणाचा आदर करेल.

**कलम-१४.** अपंग व्यक्तीस पालकत्वासंबंधी अधिकार आहेत.

**कलम-१६.** अपंग व्यक्तीस शिक्षणात सोयी- सुविधा मिळण्याचे हक्क आहेत.

**कलम-१७.** अपंग व्यक्तीस मोफत शिक्षण, शिष्यवृत्ती, शिक्षण संस्था इत्यादी विषयी तरतुदी आहेत.

**कलम-१९.** अपंग व्यक्तीच्या व्यावसायिक शिक्षण व रोजगार विषयक तरतुदी आहेत.

**कलम-२०.** कोणतीही शासकीय आस्थापना कोणत्याही अपंग कर्मचारी व्यक्तीशी भेदभाव करणार नाही. वाजवी सोयी आणि योग्य असे अडथळामुक्त व अनुकूल वातावरण निर्माण व उपलब्ध करून देतील. अपंगत्वाच्या आधारे बढती/पदोन्नती नाकारली जाणार नाही. सेवेच्या दरम्यान अपंग व्यक्तीला बडतर्फ करणार नाही.

**कलम-२२**. प्रत्येक आस्थापना अपंग कर्मचारी व्यक्तीच्या अभिलेखांची नोंद ठेवेल. प्रत्येक रोजगार केंद्र सुद्धा रोजगार शोधणाऱ्या अपंग व्यक्तींच्या नोंदी ठेवतील.

**कलम-२३**. प्रत्येक शासकीय आस्थापना तक्रार निवारण अधिकाऱ्यांची नेमणूक करेल. कर्मचाऱ्यांनी तक्रार नोंदवल्यास दोन आठवड्याच्या आत चौकशी केली जाईल. पीडित व्यक्ती केलेल्या कारवाईने समाधानी नसल्यास जिल्हास्तरीय अपंग समितीला संपर्क करू शकतो.

**कलम-२५**. अपंग व्यक्तीस प्राधान्यक्रमाने आरोग्यसेवा मिळण्याचा अधिकार आहे.

**कलम-२९**. अपंग व्यक्तीस सांस्कृतिक जीवन आणि इतरासह मनोरंजक उपक्रमात सहभागी होण्याचा हक्क आहे. अपंग कलाकार आणि लेखकांना त्यांची आवड आणि गुणांचा पाठपुरावा करण्यासाठी सुविधा, सहाय्य आणि प्रायोजकत्व इत्यादी अधिकार दिलेले आहेत.

**कलम-३०**. अपंग व्यक्तीस क्रीडा विषयक सुविधा मिळण्याचा हक्क आहे.

**कलम-३४**. अपंग व्यक्तींना किमान ४% शासकीय आस्थापनेत आरक्षण असेल.

**कलम-३५**. अपंग व्यक्तींना खाजगी क्षेत्रात किमान ५% आरक्षण असेल.

**कलम-३७.** अपंग व्यक्तीस शेतजमीन आणि घर वाटपात ५% आरक्षण आणि अपंग महिलांना योग्य प्राधान्य राहील.

**कलम-३८**. लक्षणीय अपंगत्व असलेल्या व्यक्तीस उच्च सहाय्य केले जाईल.

**कलम-४१**. अपंग व्यक्तीस सुगम्य वाहतुक सुविधा, बस थांबे, रेल्वे स्टेशन, विमानतळ इत्यादी वरील जागा, तिकीट काउंटर, शौचालय इत्यादी अपंग व्यक्तींशी सुसंगत असावे.

**कलम-७४**. नुसार मुख्य आयुक्त तर,

**कलम-७९**. नुसार राज्य आयुक्त अपंगांना न्याय देण्यासाठी असतील.

**कलम-८४**. नुसार विशेष न्यायालय तर,

**कलम-८५**. नुसार विशेष सरकारी वकील अपंगासाठी असतील.

**कलम-८८**. शासन अपंग व्यक्तीसाठी राज्य निधीची तरतूद करेल.

**कलम-८९**. या कायद्यातील नियमांचे उल्लंघन केल्यास रुपये १०,०००/- ते रुपये ५,००,०००/- पर्यंत दंडाची तरतूद केली आहे.

**कलम-९२**. जो कोणी अपंग व्यक्तीचा सार्वजनिक ठिकाणी अपमान करतो, धमकी देतो, मारहाण करतो, शक्ती वापरतो, अप्रतिष्ठा करतो, अपंग महिलेचा विनयभंग करतो, अपंग व्यक्तीवर ताबा व नियंत्रण मिळवितो, अन्न व द्रव्य नाकारतो, लैंगिक शोषण करतो, कोणत्याही अंगाला / ज्ञानेंद्रियाला स्वइच्छेने जखमी करतो, सहाय्यक साधनांना क्षति पोहोचवतो किंवा तसा प्रयत्न किंवा हस्तक्षेप करतो, अपंगत्व असलेल्या महिलेवर तिच्या संमतीशिवाय वैद्यकीय प्रक्रिया निर्देशित करतो, ज्यामध्ये गर्भाचा गर्भपात होतो किंवा होण्याची शक्यता असते यासाठी ६ महिने ते ५ वर्षापर्यंत तुरुंगवासाची शिक्षा तसेच दंडही होऊ शकतो.

**कलम-९३.** जो कोणी अपंग हिताची माहिती, दस्ताऐज, लेखा किंवा कागदपत्रे सादर करण्यास अपयशी ठरतो, जे त्यांचे कर्तव्य आहे यातील प्रत्येक गुन्ह्याबाबतीत जास्तीत जास्त रुपये २५,०००/- पर्यंत दंडाची शिक्षा होऊ शकते. आणि सातत्याने अपयश आल्यास किंवा नकार दिल्यास दंडाची शिक्षा. मूळ आदेशाच्या तारखेनंतर पुढील प्रत्येक दिवसासाठी रुपये १०००/- दंड असेल.

**कलम-९६.** या कायद्यातील तरतुदी इतर कोणत्याही कायद्याच्या तरतुदींच्या अनिश्चित असतील ना की त्यांचे महत्त्व कमी करण्याच्या असतील**.** (जिल्हा परिषद कोल्हापूर, २०२१: ७-५३)

वरीलप्रमाणे भारत सरकारने दिव्यांगासाठी / अपंगांसाठी त्यांच्या विकास व संरक्षणासाठी वेगवेगळे कायदे बनविलेले आहेत.

**निष्कर्ष :**

भारत सरकारने अपंग व्यक्तीसाठी बनविलेले कायदे हे अपंगांना बळ देणारे आहेत हा उद्देश घेऊन हे कायदे बनविले. पण आजही बऱ्याच कायद्याची दिव्यांग व्यक्तीच्या नातेवाईकांना माहितीच नाही. कोण कोणती कागदपत्रे जोडली पाहिजेत, योजना असूनही बरेच अपंग यापासून वंचित आहेत. बऱ्याच योजना यांचे लाभ दलाल लोक करून घेताना दिसतात. त्यामुळे अजूनही समाजात अपंगांविषयीच्या कायद्यांची साक्षरता झालेली

नाही. सरकारने बनविलेल्या योजना आणि कायदे यांची तत्काळ अमंलबजावणी झाली पाहिजे. तसेच बऱ्याच कायद्यामध्ये सुधारणा करणेही अपंगांच्या हिताच्या दृष्टीने महत्वाचे आहे.

**संदर्भ :**


1) https://ncwapps.nic.in/acts/
2) https://niepmd.tn.nic.in/
3) https://thenationaltrust.gov.in/
4) https://thenationaltrust.gov.in/1999
5) https://disabilityaffairs.gov.in/2006
6) दिव्यांग व्यक्ती अधिकार अधिनियम २०१६, जिल्हा परिषद कोल्हापूर अहवाल, २०२१.